संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणुकीचे सामाजिक मूल्यांकन व्हावे

**लोकसभा** निवडणुकीच्या निकालाची उत्कंठा शिगेला पोहचली असतानाच त्या निकालांचा केवळ राजकीय संदर्भ तपासण्याच्या मनोवृत्तींच्या वेगवेगळ्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळू शकतील. आणि म्हणूनच आम्ही वारंवार हे स्पष्ट करीत आहोत की प्रचंड पैसा आणि मनुष्यबळ खर्च करून पार पाडली जाणारी निवडणूक प्रक्रिया म्हणजे लोकशाही नाही. किंवा ही निवडणूक म्हणजे देशाचे भवितव्य असाही विचार करणे योग्य ठरणार नाही. निवडणूक हा केवळ लोकशाही व्यवस्थेतला एक भाग ठरू शकतो. पण निवडणुकीच्या निमित्ताने तितकेच मोठे सामाजिक आणि राष्ट्रीय अभिसरण घडून येते याचा गांभियनि विचार झाला पाहिजे. ज्याप्रमाणे दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. त्या जनगणनेमागचा उद्देश केवळ देशाची लोकसंख्या मोजणे एवढ्यापुरताच मर्यादित नसतो तर त्यातून अनेक राष्ट्रीय आणि सामाजिक मुद्दांचे विश्लेषण घडून येते. मग त्यातून देशाची साक्षरता , रोजगार, रोजगारांचे विविध प्रकार लोकांच्या राहणीमानाची परिस्थिती, उत्पन्नाचे स्वरुप अशा बऱ्याच मुद्द्यांचा परामर्ष घेता येतो. या जनगणनेमध्ये लाखो कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात केलेला असतो. एका विशिष्ट मुदतीमध्ये ही सगळी मोहीम पार पाडली जाते. यामधून खऱ्या अर्थाने त्या देशाचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीयसुध्दा मानचित्रआकाराला येत असते. तशाच स्वरुपाने लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून निवडणुकीत बरीच मोठी मनुष्यशक्ती काम करीत असते. एकाचवेळी देशभर घडून येणारी ही प्रक्रिया एका विशिष्ट कालावधीत पूर्ण केली जाते. त्याचे राजकीय परिणाम काहीही असले तरीसुध्दा सामाजिक अंगाने किंबहुना लोकशाहीच्या सिध्दांताशी निगडीत काही मुद्दांचा अभ्यास होणे गरजेचे ठरते. जसे यावेळच्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांचे प्रमाण वाढल्याचा निष्कर्ष पुढे येत आहे. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा यंदा दोन ते तीन टक्के महिला मतदारांनी अधिक मतदान केल्याचे समोर येते म्हणजे २०१४ ला झालेले ६६.४ टक्के मतदान यंदा ६७.१ टक्क्यांपर्यंत पोहचले. याला प्रामुख्याने महिला घटक कारणीभूत ठरला आहे.

### महिला मतदारांचे वाढते प्रमाण

आश्चर्याची गोष्ट म्हणजे बिहार, उत्तराखंड, या उत्तर भारतातील राज्यांमध्ये महिला मतदारांनी केलेले हे मतदान एकाअर्थी निर्णायक स्वरुपाचे ठरते. या मतदानाचा संदर्भ राजकीय अर्थानेच घेण्याचे कारण नाही. त्यांना मतदान करण्याची संधी मिळण्यापासून ते आपला हक्क बजावण्याची त्यांनी दाखवलेली ही तयारीसुध्दा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते. आणि याच गोष्टीचे सामाजिक अंगाने विचारमंथन झाले पाहिजे. एकेकाळी महिलांना मताधिकारच नव्हता. तर आज भारतासारख्या लोकशाहीवादी देशात महिला मतदारांच्या संख्येत वाढ होणे ही गोष्ट सामाजिक परिवर्तनाची निदर्शक ठरते. अशाच स्वरुपात १८ ते २५ या वयोगटातील किती टक्के तरुणांनी मतदानाचा हक्क बजावला याची आकडेवारी निवडणूक आयोगाने जाहीर केली पाहिजे. कारण ज्या देशाच्या लोकसंख्येतच तरुणांचे प्रमाण सर्वाधिक आहे. आणि जिथे अठरा वर्षावरील तरूणाला मताधिकार दिला गेला आहे तो तरुण या सगळ्या लोकशाहीकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहातो हे लक्षात येऊ शकेल. त्या तरुणांमध्ये यासंदर्भात असलेली जागृती कोणत्या स्वरुपाची आहे हेसुध्दा स्पष्ट होईल. खरे तर या निमित्ताने प्रथमच मतदान करणाऱ्या म्हणजेच आपल्या वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेल्या मतदारांची स्वतंत्रपणे नोंद करता येऊ शकली असती. कारण मतदानाचा दिलेला अधिकार त्यांनी तो कशा पध्दतीने बजावला तो बजावताना कितपत उत्साह दाखवला किंवा त्यांची यासंदर्भातली मानसिक तयारी काय आहे हेदेखील स्पष्ट होऊ शकले असते. दुर्दैवाने निवडणूक आयोगसुध्दा ज्या प्रदीर्घ अशा प्रक्रियेकडे केवळ राजकीय अंगानेच बघत राहाते. आणि लोकशाहीचा सामाजिक आशय दुर्लक्षित करीत राहाते. ज्या मतदानाला किंवा निवडणुकीला लोकशाहीचा उत्सव समजून देव्हाऱ्यात बसवण्याचा प्रयत्न होतो. तोदेखील तितकासा योग्य नाही असे वाटू लागते. लोकशाहीला राजकारणाच्या कोंदणामध्ये बसवण्याचा राजकारण्यांचा स्वार्थी प्रयत्न ओळखला पाहिजे आणि त्याचा निवडणुकीपुरता असलेला संबंध पुसून काढला गेला पाहिजे.

### दृष्टीकोन बदला

एवढी मोठी लोकशाही प्रक्रिया राबवत असताना त्याचा सामाजिक आणि राजकीय अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील उपयोग झाला पाहिजे म्हणूनच निवडणूक आयोगाच्या कामाची व्याप्ती वाढवली पाहिजे. अक्षरशः अब्जावधीचा पैसा आणि कोट्यवधी लोक ज्या निवडणूक प्रक्रियेशी या ना त्या कारणाने जोडले जातात. त्याचे राष्ट्रीय आणि सामाजिक संदर्भ राजकारणाच्या पलीकडे असू शकतात असा दृष्टीकोन निर्माण करण्याची आवश्यकता आहे. निवडणूक म्हणजे राजकारण्यांनी वेठीला धरलेला प्रकार ठरता कामा नये. उलट या संधीचा वापर करून अनेक विषयांचे विश्लेषण आणि विचारमंथन झाले पाहिजे. निवडणुकीला उभे राहिलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता त्यांच्या व्यवसायाचे स्वरुप त्यांचे आर्थिक उत्पन्न याचादेखील यानिमित्ताने अभ्यास होऊ शकतो. म्हणजेच लोकांनी निवडून द्यायचे लोकप्रतिनिधी कशा स्वरुपाचे आहेत याचा गेल्या काही वर्षातला आढावा यानिमित्ताने समाजासमोर येऊ शकतो. खरे तर २०१९च्या निवडणुकीतले मतदानसुध्दा सत्तर टक्क्यांच्या दिशेने आगेकूच करणारे म्हणावे लागेल. अधिकाधिक जनजागृती करून राजकारणापलिकडे मतदान हा राजकीय आणि सामाजिकतेचा मापदंडदेखील आहे. हे लोकांच्या मनावर बिंबवले पाहिजे मतदान प्रक्रियेच्या संधीचा उपयोग हा लोकशाहीशी संबंधित घटकांचा विचार करणारा ठरला पाहिजे. दुर्दैवाने अशा प्रकारची दृष्टीच विकसित न झाल्याने मतदान म्हणजे राजकारण्यांना आंदण दिलेली भरमसाठ खर्चाची एक प्रक्रिया एवढेच त्याचे स्वरुप आकाराला आले आहे.लोकांमध्ये अशाच स्वरुपाची धारणा निर्माण झालेलीआहे. जवळपास सतरा लोकसभा निवडणुका या देशाने अनुभवल्या लोकशाही व्यवस्थेची पंचाहत्तरी पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर हा देश आहे. अशावेळी त्याचे अधिक अभ्यासपूर्वक तसेच सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टीकोनातून मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे.